फिर्याद दि 13/09/2019.

मी शे उस्मान शे अकबर वय 36 वर्ष रा खा नौकरी औरंगाबाद अलायन्स कंपनी रा फारोळा ता पैठण मो नं 8459991207.

समक्ष पोलीस स्टेशनला हजर येऊन लेखी फिर्याद देतो की मी वरील ठीकाणी राहणारा आसून औरंगाबाद अलायन्स कंपनी मध्ये हेल्पर म्हणून काम करतो.मला दोन भाऊ असून पैकी शे अन्वर हा एक भाऊ आहे त्यास दोन मूले व एक मूलगी आहे पैकी शे अली हा एक मूलगा असून त्याचे वय 14 वर्ष आहे आम्ही बिडकीन औरंगाबाद रोडलगत असलेले फारोळा फाटा येथे राहण्याकरीता आहे.

दि 10/09/2019 रोजी 15.00 वा सूमारास मी व सोबत पूतन्या अली तसेच भाऊ अन्वर असे सर्वजन घरासमोर असलेले टपरी समोर बसलेलो होतो त्यावेळेस पूतन्या अली हा आमचे समक्ष लघवी करण्यासाठी म्हणून रोडच्या पश्चीम बाजूने असलेले वेड्या बाभळीच्या जवळ लघवी करण्याकरीता गेला जात असतांना तो बिडकीन औरंगाबाद रोड ओलांडून जात होता त्याचवेळी बिडकीन कडून येणारे रोडने एक मोटारसायकल स्वार याने त्याचे ताब्यातील मोटारसायकल भरधाव वेगात व हयगय पणाने चालवून पूतन्या अली यास समोरून जोराची ठोस दिली व त्यामूळे पूतन्या आली हा जखमी होऊन त्याचे डाव्या पायाला व हाताला जबर दूखापत झाली सदर घटना घडल्यानंतर मी मोटार सायकल चालक याचे मोटार सायकलचा नंबर पाहीला असता एम एच 20, इ झेड 4543 शाईन कंपनीची तसेच मोटारसायकल चालक यास त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव आकाश भगवान कोकाटे रा पैठणखेडा असे सांगितले होते नंतर मी पूतन्या अली यास भाऊ अन्वर याचे सह तसेच तेथे जमलेल्या लोकांपैकी काही लोकांची मदत घेऊन मोटारसायकलवर बिडकीन ग्रामीण रूग्नालय येथे औषधउपचाराकरीता आणले होते त्यांनी प्राथमिक उपचार करून औरंगाबाद येथील घाटी दवाखाना येथे जाण्याचे सांगितले तेथे जाणे सोयीस्कर वाटले नाही म्हणून आम्ही काबरा हाँस्पीटल यांचेकडे पूतन्या अली यास अधिक उपचाराकरीता दाखल केले आहे व पूतन्या अली हा त्या ठीकाणी औषधउपचार घेत आले करीता मोटार सायकल चालक आकाश भगवान कोकाटे यांचे विरूद्ध कायदेशीर कारवाई व्हावी.सदर प्रकरणात जखमी मूलगा याची एमएलसी ही स्वताहा फिर्यादी यांनी हजर केल्याने त्यांची वर नमूद फिर्याद घेण्यात आली आहे.

समक्ष

दि 13/09/2019
वेळ - 16:30 वा.
गुरनं - I - 325/2019
क - 279, 337, 338 IPC प्रमाणे
गुन्हा दाखल करून पुढील तपास
मा स्पोनि सो यांचे आदेशाने
पोहे/184 बाडके हे करीत आहेत.

[signature]
पो. ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता. पैठण जि. औरंगाबाद ग्रामीण

ही फिर्याद दिली सही

[signature]